महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

---

क्रमांक: संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/विशि-४ दिनांक :- २६ जुलै, २०२३.

प्रति,

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा,
विधान मंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई.

विषय :- संदिप विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल विधानमंडळाच्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्याबाबत.

महोदय,

स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठाच्या अधिनियमातील कलम ४३ (३) मधील तरतूदीनुसार विद्यापीठाचे वार्षिक अहवाल राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवावयाचे आहेत. सदर अधिनियमाची प्रत सोबत जोडली आहे. त्यानुषंगाने संदिप विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनाच्या वेळी विधानसभेच्या पटलावर सादर करावयाचे आहेत. सदर वार्षिक अहवाल विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यास अनुमती देण्याची विनंती मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या पत्राव्दारे मा. विधानसभा अध्यक्ष यांना करण्यात आली आहे. (सुलभ संदर्भासाठी प्रत सोबत जोडली आहे.)

२. संसदीय कार्य विभागाच्या दि. २३/०९/२०१५ च्या शासन परिपत्रकानुसार वार्षिक अहवाल महाराष्ट्र विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याकरिता सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार संदिप विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल विधानसभेच्या पटलावर ठेवण्यासाठी वार्षिक

अहवालाच्या पेनड्राइव्ह च्या स्वरुपात १ प्रत तसेच (मराठी व इंग्रजी) पुस्तक रुपाने प्रत्येकी १० प्रती यासोबत पाठविण्यात येत आहेत.

३. सदर अहवाल त्याचे इंग्रजी व मराठीमध्ये तयार करणे व त्याची छपाई करणे, कोवीड-१९ या साथीच्या आजारादरम्यान शक्य झाले नाही. त्यामुळे सदर अहवाल शासनास सादर करण्यास विलंब झाला असल्याचे विद्यापीठाने कळविले आहे.

४. आपणास विनंती करण्यात येते की, त्याअनुषंगाने संदिप विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ या कालावधीचा वार्षिक अहवाल महाराष्ट्र विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची कार्यवाही करण्यात यावी.

आपला,

(अर्जित बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

सहपत्र:-वरीलप्रमाणे